सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

संपादक : घनश्याम पाटील

- वर्ष : ६
- अंक : ११
- पाने : ८
- पुणे

मूल्य ₹3

www.chaprak.com

KaMant masale

एकदा वापरून पहाच!

किंग ऑफ टेस्ट

व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले


संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.
तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००

Email : dkamant@rediffmail.com Web. : www.kamantmasale.com

■ सोमवार दि. २८ मार्च ते ०३ एप्रिल २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

■ Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** ■ Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 28/03/2016

# 'लकवा'मार विकारवंत!



## संपादकीय

घनश्याम पाटील : ७०५७२९२०९२

**पृथ्वीराज** चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना बालगंधर्वला झालेल्या एका कार्यक्रमात राज्य सरकारवर टीका करताना शरद पवार म्हणाले होते, 'मुख्यमंत्री कोणत्याही फाईलवर सह्या करत नाहीत. त्यांना 'लकवा' झालाय.'

त्यापूर्वी राम मनोहर लोहिया यांनी सांगितले होते की, ''आजच्या काही समाजवाद्यांना 'लकवा' झालाय! विचारावर ठाम नसणाऱ्या आणि कृतीशुन्य समाजवादी कार्यकर्त्यांना 'लकवामार समाजवादी' म्हटले पाहिजे.''

सध्या पुरोगामित्वाच्या नावावर मिरवणारे काही तथाकथित समाजवादी याच 'लकवामार विकारवंता'त मोडतात. कन्हैयाकुमारला छोट्या भावाची उपमा देणारे कुमार तथा सुमार सप्तर्षी याच विकारवंतांपैकी एक! अर्धसत्य माहिती ठासून मांडणे आणि आपणच समाजाला तारण्याचा ठेका घेतलाय अशा आविर्भावात असे 'विकारवंत' जगत असतात. सप्तर्षींनी एकेकाळी 'युक्रांद'च्या माध्यमातून थोडेफार काम हाती घेतले होते; मात्र ज्याच्याकडे किमान सभ्यता आणि मूलभूत ध्येयनिष्ठा नाही तो समाजमनावर कितपत प्रभाव पाडू शकणार? एकीकडे 'जातीअंताची लढाई' असे बोजड शब्द वापरायचे आणि दुसरीकडे भेटणाऱ्या प्रत्येकाला थेट त्याची जात विचारायची आणि आपण आयुष्यभर किती दिवे लावले याचे पाल्हाळीक चर्वितचर्वण करायचे यातच यांची हयात गेली. एकेकाळी अण्णा हजारे यांना 'थोरले बंधू' मानणारे सप्तर्षी आता कन्हैयाला 'धाकल्या' भावाची उपमा देत आहेत. त्याला पुण्यात गांधीभवनात आणण्याचा त्यांचा मानस आहे.

एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे असे एकेकाळचे समाजवादी आणि आजच्या काळातील कुमार सप्तर्षींसारखे सुमार लोक पाहिले की समाजवादी चळवळीला खीळ का बसली याचे उत्तर मिळते. समाजवादाच्या नावाने कोकलणाऱ्यांनी समाजवादी नेत्यांनी कोणते संघटनात्मक कार्य केले याचे उत्तर द्यावे! राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाच्या विरूद्ध बोलणे, लिहिणे इतक्या मर्यादित स्वरूपात यांची पुरोगामित्वाची व्याख्या येऊन ठेपली आहे. ही मंडळी केवळ वयाने वाढली आहेत. त्यांची बौद्धिक उंची मात्र कधीच खुंटली आहे, हे इवलेसे पोरही सांगेल. म्हणूनच त्यांची सातत्याने चर्चेत राहण्याची केविलवाणी धडपड सुरू असते. आचार्य अत्रे यांनी त्या काळात समाजवादी विचारधारेविषयी लिहिले होते की, ''समाजवाद या शब्दातला स कधीच गळून पडलाय आणि केवळ 'माजवाद' उरलाय!'' अत्रेंच्या या निरीक्षणात आजदेखील तसूभरही फरक पडल्याचे दिसत नाही.

सुप्रसिद्ध पत्रकार भाऊ तोरसेकर विचारतात, ''विचारांची लढाई विचाराने झाली पाहिजे, ही भाषा पुरोगाम्यांना कधी कळली? सोवियत युनियन कोसळल्यानंतरचा हा साक्षात्कार आहे का?'' भाऊंचा हा सवाल बिनतोड आहे. आजचे समाजवादी या प्रश्नाचे उत्तर देण्याएवढे सक्षम नाहीत. त्यांची तेवढी वैचारिक कुवतही नाही. जाती-जातीत, धर्मा-धर्मात, प्रांता-प्रांतात फूट पाडणे, येनकेनप्रकारे स्वत:चा स्वार्थ साधणे आणि आपल्या आडमुठ्या भूमिकेपायी समाजाला वेठीस धरणे हा यांचा उद्योग नवा नाही.

कन्हैयाकुमार पुण्यात आल्याने विशेष असे काय घडेल? कुमार सप्तर्षी यांच्यासारखे अडगळीत पडलेले 'विकारवंत' चर्चेत येतील, काही राष्ट्रीय माध्यमांचे लक्ष यांच्याकडे केंद्रीत होईल. आजच्या तथाकथीत पुरोगाम्यांचे, समाजवाद्यांचे 'बापजादे' काय करत होते याचेही ज्ञान या भामट्यांना नाही. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कम्युनिष्टांविषयीची मते काय होती, याचा अभ्यास आपण करणार की नाही? प्रकाश आंबेडकर ज्या दिशेने आजच्या समाजाला नेऊ पाहत आहेत ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होते का? हिंदुंचा, ब्राह्मणांचा द्वेष हा एकमेव अजेंडा घेऊन या लोकांची वाटचाल सुरू आहे. एकीकडे जातीच्या आधारावर मिळणारे 'सर्वप्रकारचे' लाभ घ्यायचे, आरक्षणासारख्या विषयावरून रान पेटवायचे आणि दुसरीकडे जातीयवाद संपवण्याची भाषा करायची, ब्राह्मणांना शिव्या घालायच्या अशी दुटप्पी भूमिका हे लोक घेतात.

कन्हैयाकुमार आणि राहुल गांधी या दोघांच्या बौद्धिक पातळीत तसा फारसा फरक दिसत नाही. दुर्दैवाने अशी बिनडोक मंडळी आजच्या तरूणाईचे नेतृत्व करू पाहत आहेत. राष्ट्रभक्ती हे पाप वाटावे अशी परिस्थिती या लोकांनी निर्माण केली आहे. आपल्या नेत्यांनी अशा भामट्यांना पाठिशी घातल्याने समाजात दुफळी निर्माण होत आहे. केजरीवाल, हार्दीक पटेल, रोहित वेमुला, कन्हैयाकुमार अशांनी समाजाला कोणता नवा विचार दिला किंवा ते समाजाचे नेतृत्व करण्याच्या लायकीचे आहेत का? हे तटस्थपणे पडताळून पाहिले पाहिजे. महाराष्ट्रात तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे 'सुविद्य' आमदार जितेंद्र आव्हाड कायम नौटंकी करत असतात. 'फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचे वारसदार' अशी त्यांची ओळख करून दिली जाते. त्यांचा कोणता 'वारसा' आव्हाडांनी चालवला हे मात्र सिद्ध होत नाही. दहीहंडीच्या कार्यक्रमात मुली नाचवणे, अतिक्रमणाच्या प्रश्नावरून प्रशासकीय अधिकाऱ्याशी अरेरावी करणे, पोलिसांवर हात उगारणे, फर्ग्युसनसारख्या ठिकाणी येऊन महाविद्यालयाच्या स्थापनेविषयीच

पान २ वर...

# मराठी माध्यम यशाचे माध्यम



■ प्रा. अनिल गोरे, पुणे
९४२२००१६७१

**स्पर्धा** परीक्षा देताना तसेच इतर प्रांतात, परदेशात संधी मिळाल्यास अडू नये म्हणून मुलांसाठी मराठी टाळून इंग्रजी माध्यम निवडण्याची लाट १९९० पासून महाराष्ट्रात आली. या कारणांसाठी इंग्रजी माध्यम निवडलेल्या अनेकांचा उद्देश मात्र महाराष्ट्रात सफल झाला नाही. इतर प्रांतात, परदेशात संधी मिळाल्यास अडू नये म्हणून खरेतर मराठी माध्यमच अधिक उपयुक्त आहे.

इंग्रजी माध्यमातून मराठी माध्यमापेक्षा अधिक दर्जेदार, चांगले आणि सखोल ज्ञान मिळत असते तर आर्थिक संस्थांचे उच्चाधिकारी, लेखक, कवी, संगणक तज्ञ, जिल्हाधिकारी, संशोधक, प्राध्यापक, संगीतकार, कलाकार, अभियंते, वकील, वास्तुरचनाकार, अणुशक्ती विज्ञान, वाहन निर्मिती, यंत्र निर्मिती, प्रशासकीय अधिकारी, कारखानदार, व्यापारी, वाहतूकदार, दूरसंचार उपकरण निर्मिती, शेती संशोधन, शेती विपणन, औषध निर्मिती, वैद्यकीय तज्ञ, कुशल शल्यकर्मी या सर्व क्षेत्रात इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी आघाडीवर असल्याचे आढळले असते. प्रत्यक्ष स्थिती पाहता महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रात मराठी माध्यम शाळेतील विद्यार्थी आघाडीवर आहेत. भारतीय भाषेतून शालेय शिक्षण घेतलेले अब्दुल कलाम, माशेलकर, गोवारीकर अशा शास्त्रज्ञानी जगात उल्लेखनीय ठरेल अशी मोठी कामगिरी बजावली. या शास्त्रज्ञांच्या काळात इंग्रजी माध्यम नसल्याने ते भारतीय भाषेत शिकले, असे म्हणून काही शिक्षक, पालक आणि अतिशहाणे लोक या शास्त्रज्ञांच्या मराठी किंवा भारतीय भाषा माध्यम ातून शिकण्याला कमी लेखतात, पण पुढील माहितीचा विचार करून आत्ताच्या नवतरुण पालकांनी भूमिका बदलावी, म्हणून हे पत्रक देत आहोत.

२५ ते ४० वयाचे लाखो मराठी शास्त्रज्ञ, अधिकारी, तंत्रज्ञ सध्या अब्दुल कलाम, माशेलकर, गोवारीकर यांच्याप्रमाणेच नेत्रदीपक कामगिरी करत आहेत. त्यांच्या लहानपणी इंग्रजी माध्यम उपलब्ध असूनही पालकांनी त्यांच्यासाठी मराठी माध्यम निवडले, त्याचा या यशस्वी लोकांना लाभ झाला. मराठी माध्यमामुळे त्यांना शाळेत प्रत्येक इयत्तेत त्या त्या वर्षीच विषय नीट, सखोल समजले. सगळ्या विषयांच्या शिकवण्या लागल्या नाहीत. मराठीतून अभ्यास करताना तो रोज कमी वेळात संपल्याने खेळ, कला, सांस्कृतिक उपक्रमात मोठा सहभाग घेता आला. अशा सहभागामुळे त्यांचे एकूण व्यक्तिमत्त्वच समृद्ध झाले म्हणून मोठ्या पदावरील मोठ्या उत्पन्नाच्या संधी मराठी माध्यम शाळेत शिकलेल्यांना मोठ्या संख्येने मिळाल्या. या तरुणांच्याच वयाच्या ज्या मुलांना आईबाबांनी इतरांचा चुकीचा सल्ला ऐकून इंग्रजी माध्यमात घातले त्या दुर्दैवी मुलांना मात्र मराठी माध्यमात शिकलेल्यांसारखे मोठे यश मोठ्या संख्येने मिळालेले नाही. हे पत्रक वाचणाऱ्या शिक्षक, पालक, प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी नात्यातील, परिचितांतील मुलामुलींची उदाहरणे आठवून मराठी माध्यमातील शिक्षण अधिक उपयुक्त कसे ठरले याचा आढावा घ्यावा. बालवाडी ते पदवी तसेच संशोधन पातळीवर सर्व शिक्षण स्वभाषेतून देणारे फ्रांस, जर्मनी, जपान, चीन या प्रगत देशांसह १६० देश आपापल्या परीने कशी उत्तम प्रगती करीत आहेत, याचाही आढावा घ्यावा. यातील अनेक देश महाराष्ट्राहून लहान असूनदेखील इतर देशात किंवा इतर प्रांतात जावे लागले तर मुलांचे पदोपदी अडेल अशी दिशाभूल त्यांच्या देशात केली जात नसल्याने ते मुलांना ठामपणे स्वभाषेतून बालवाडी ते पदवी, पदव्युत्तर शिक्षण देतात आणि मुलांच्या प्रगतीची वाट अडवत नाहीत. या प्रगत देशांप्रमाणे सर्व शिक्षण मराठी माध्यमात घेण्याची संधी महाराष्ट्रातील पालकांनी आपल्या मुलामुलींना दिली पाहिजे.

मराठी, इंग्रजी माध्यमांच्या तुलनेत मराठी माध्यम शिक्षण उच्च दर्जाचे, मुलांना सहज आत्मसात होणारे, जीवनात उपयोगी ठरते आणि कमी खर्चात मिळते. युनेस्को या संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षणविषयक समितीचा अहवाल म्हणतो मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या बालकांची आकलन शक्ती आणि गुणवत्ता परक्या भाषेतून शिक्षण घेतलेल्या बालकांपेक्षा अधिक चांगली असते. आपल्या बालकांची गुणवत्ता आणि आकलनशक्ती वाढावी असे प्रत्येक पालकाला वाटते, पण नुसते वाटून उपयोग नाही तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार कृती करून महाराष्ट्रातील प्रत्येक पालकाने मुलांसाठी मराठी माध्यम निवडले पाहिजे.

**मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व–**

कोणतीही गोष्ट मातृभाषेतून लवकर, चांगली समजते. राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय उद्योग विविध भाषांत जाहिराती करतात. एकट्या इंग्रजीत जाहिरात केल्यास धंदा कमी पण ग्राहकांची मातृभाषेतील जाहिरातीमुळे धंदा अधिक होतो असा त्यांचा अनुभव आहे. सारे जग शिक्षण, उद्योग, व्यापारात स्वत:च्या आणि एकमेकांच्या मातृभाषेला अतिशय महत्त्व देते. आपणही महाराष्ट्रात मराठीला सर्व क्षेत्रात महत्त्व द्यावे, त्याची सुरुवात मुलांच्या शिक्षणासाठी मराठी माध्यम निवडून करावी.



परभाषेतील मजकूर डोळ्यापर्यंत, कानापर्यंत पोचतो. मातृभाषेतील मजकूर, बोलणे, लिखाण केवळ डोळा आणि कानापर्यंत नाही तर मनात अंतर्मनात पोचतात. महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमातील बालकांनी कष्टाने पाठ केलेल्या गोष्टी लवकर विसरतात. मराठी माध्यमातील बालकांना कमी पाठांतर करूनही त्याच गोष्टी आयुष्यभर लक्षात राहतात शिवाय सहज सुलभतेने व्यक्त करता येतात. मराठी माध्यम निवड ही महाराष्ट्रीय पालकांनी मुलाच्या भवितव्यासाठी केलेली सर्वोत्तम, सुरक्षित आणि लाभदायक गुंतवणूक ठरते.

**मराठी माध्यमाबाबत गैरसमज आणि वस्तुस्थिती –** शाळेतील शिक्षण मराठी माध्यमात घेतले आणि पुढील उच्चशिक्षण इंग्रजीतून घ्यावे लागले उच्च शिक्षण अवघड जाते हा महाराष्ट्रातील सर्वात जुना, सर्वात चुकीचा समज असून ती एक अंधश्रद्धाच आहे.

१० वीपर्यंत मराठी माध्यमात शिकल्यानंतर विज्ञान शाखेत नाईलाजाने इंग्रजीतून शिकणाऱ्यांना केवळ पहिले दोन महिने भाषेची अडचण येते. १० वीपर्यंत इंग्रजी माध्यमात शिकल्यानंतर विज्ञान शाखेत इंग्रजीतून शिकणाऱ्यांना भाषेपुरती अडचण येत नाही हे खरे, पण विविध विषय समजण्यात मात्र अडचण येते, हा लाखो मराठी भाषकांचा अनुभव आहे. हा अनुभव लक्षात घेऊन केवळ दोन महिने अडचण सोसण्याची तयारी ठेऊन १० वीपर्यंत गणित, विज्ञान, इतिहास, भुगोल हे विषय, त्यातील संकल्पना पक्क्या करून घेणे अधिक लाभाचे ठरते. पुढील उच्चशिक्षण इंग्रजीत घेण्यासाठीही १० वी पर्यंत मराठी माध्यम असणे अधिक उपयुक्त हे सर्वांनी लक्षात घ्यावे.

**मातृभाषेतील शिक्षण – स्थानिक परिस्थितीशी निगडीत आणि परिपूर्णः**

मराठी माध्यमात 'येरे येरे पावसा' कविता आहे जी दुष्काळी महाराष्ट्रातील परिस्थितीला साजेशी आहे. इंग्रजी माध्यमात 'रेन रेन गो अवे' ही सतत पाउस असणाऱ्या इंग्लंडला साजेशी आहे. इंग्रजी माध्यमाची बहुसंख्य मुले 'हर हर महादेव' ही घोषणा 'हरी हरी ारहरवशे' अशी असल्याने 'हार हार महदेव' अशी चुकीची आणि अर्थाचा अनर्थ करून वाचतात. १० वीच्या राज्य पातळीवरील परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणाऱ्या अनेक शिक्षकांचा असा अनुभव आहे की, मराठी माध्यम विद्यार्थी सविस्तर आणि विस्तृत उत्तरे लिहितात आणि बहुतांशी इंग्रजी माध्यम विद्यार्थी त्याच प्रश्नांची उत्तरे व्यवस्थित आणि परिपूर्ण न लिहिता त्रोटक लिहितात. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्र एसएससी बोर्ड सुरु झाल्यापासून किंवा त्यापूर्वी मुंबई बोर्डाची मॅट्रिक परीक्षा असतानाही गेल्या ११० वर्षात कायम मॅट्रिकच्या निकालात मराठी माध्यम विद्यार्थी महाराष्ट्रात पहिला आला आहे. गेल्या ११० वर्षात एकदाही इंग्रजी माध्यम विद्यार्थी महाराष्ट्रात मॅट्रिकला पहिला येऊ शकला नाही, इतकेच नव्हे तर गुणांच्या उतरत्या क्रमाने विद्यार्थ्यांची मांडणी केली तर दरवर्षी पहिल्या एक लाख विद्यार्थ्यांमध्ये ८०००० हून अधिक विद्यार्थी मराठी माध्यमाचे असतात.

माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी केलेल्या पाहणीतील निष्कर्षानुसार मराठी माध्यमातील मुलांनी इंग्रजीतील उच्चशिक्षणात अधिक प्रगती केल्याचे आढळले आहे. १० वीपर्यंत मराठी माध्यमात शिकलेल्या विद्यार्थ्यांना जरी नाईलाजाने इंग्रजी माध्यमात उच्चशिक्षण घ्यावे लागले तरीही ते विद्यार्थी १० वीपर्यंत इंग्रजी माध्यमात शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेने अधिक यश मिळवतात. राज्यातील जुन्या आणि नामवंत कनिष्ठ महाविद्यालयात दरवर्षी ११ वी विज्ञान वर्गाचा सहामाही परीक्षेचा निकाल या संदर्भात महत्त्वाचा असतो. या सर्व ठिकाणी ११ वी विज्ञान वर्गात १० वीपर्यंत मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही माध्यमातून शिकलेले विद्यार्थी असतात आणि त्यांना फक्त इंग्रजी माध्यमातून गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र हे विषय शिकवले जातात. १० वीपर्यंत मराठी माध्यमात शिकलेले आणि सेमी इंग्रजीचा पर्याय न निवडलेल्या विद्यार्थ्यांना माध्यमाची भाषा बदलण्याचा दोन महिने होणारा त्रास पचवूनही सहामाही परीक्षेत ते सर्व विषयांत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होतात. मराठी माध्यम ाच्या ज्या विद्यार्थ्यांनी १० वीपर्यंत सेमी इंग्रजी पर्याय निवडला ते या परीक्षेला कमी गुणांनी उत्तीर्ण होतात. १० वीपर्यंत इंग्रजी माध्यमात शिकलेल्या अनेकांच्या शालेय अभ्यासक्रमातील संकल्पना कच्च्या राहिलेल्या असल्याने इंग्रजीचा भरपूर सराव असूनही ते एक दोन किंवा सर्व विषयांत या सहामाही परीक्षेला अनुत्तीर्ण होतात. उच्चशिक्षणातील अपयशाचा हा धोका टाळण्यासाठी सर्व पालकांनी मुलांना मराठी माध्यम शाळेत १० वीपर्यंत शिकवणे अत्यंत आवश्यक आहे.

**इंग्रजी माध्यम शाळांच्या अपुऱ्या यशाचे एक मुख्य कारण –**

मराठी माध्यमाच्या बहुसंख्य शाळा शासन अनुदानित असल्याने मराठी माध्यम शाळांमध्ये शिक्षकांना भरपूर वेतन, निवृत्ती वेतन, वैद्यकीय सहाय्य, पर्यटन आणि इतर अनेक भत्ते मिळतात म्हणून पुरेशी शैक्षणिक पात्रता असलेले उच्चशिक्षित आणि प्रशिक्षित शिक्षक मराठी माध्यम शाळांमध्ये असतात. इंग्रजी माध्यम शाळेत पालक प्रसंगी कर्ज काढून भरपूर शुल्क देत असले तरी ते मराठी माध्यमाइतके वेतन आणि लाभ शिक्षकांना देण्यास पुरत नसल्याने

पान ३ वर...

# जीवन म्हणजे आहे तरी काय?

मित्रांनो, जीवन म्हणजे काय? असं जर कोणाला विचारलं तर? खरं जीवन काय आहे हे सांगता येईल का हो? जीवन म्हणजे काय प्रक्रिया आहे किंवा ती अशी अशी एक वस्तू आहे आणि असेल तर ती दाखवता येईल काय? तरी पण कोणीतरी जर सांगायचंच ठरवलं की, जीवन म्हणजे काय ते मी सांगू शकतो आणि सांगू लागेल की, जीवन म्हणजे एक नदीच्या पात्रातील होडी आहे जी एका किनाऱ्याहून (जन्म) दुसऱ्या किनाऱ्याकडे (मृत्यू) नेऊन पोहोचविते. दुसरा एखादा सांगेल की, जीवन म्हणजे काय तर जन्म आणि मृत्यू या दोन्हींना जोडणारा प्रवास आहे. कोण म्हणेल की, जीवन म्हणजे काहीही नाही तर जगण्यासाठी, पोट भरण्यासाठी केलेली मरेपर्यंतची धडपड. जीवन हे निसर्गाने मनुष्य प्राण्याला दिलेली एक देणगी आहे. ते एक आवाहन आहे जे प्रत्येकाला स्वीकारावेच लागते. जीवन म्हणजे मायाजाल, म हेजाल आहे. ते संसाराचा गाडा आहे जो की मरेपर्यंत फरफटत न्यावाच लागतो. कोणाला वाटेल जीवन म्हणजे पैसा धनसंपत्ती, तर कोणाला ते मोजमजा, चैन वाटेल, खरं म्हणजे ते अनुभवाची खाण आहे, कोणासाठी ते कष्ट, त्रास, संकट आहे, तर कोणासाठी ते गुलाबासारखे सुगंधी आहे. जीवन म्हणजे जगण्यासाठी आयुष्यभर केलेली नुसती ओढाताण आहे.



अशा जीवनाविषयीच्या प्रत्येकाच्या कल्पनांची यादी करायचं म्हटलं तर ती संपणारच नाही. पण एकूणच वरील सर्व कल्पनांवरून आपण असे समजून चालू की जीवन म्हणजे एक आवाहन आहे, मौज मस्ती आहे, तो एक सुखद प्रवास आहे तर पोट भरण्यासाठी केलेली एक धडपड आहे.

मित्रांनो इतके सगळं ऐकल्यावर आतातरी नक्की सांगता येईल का की, जीवन म्हणजे काय? नाही ना! जीवनाचा अर्थ समजणे कठीण आहे कारण जो जसं जीवन जगतो तसा तो जीवनाचा अर्थ लावतो आणि जसं अनुभवतो तसं त्याकडे पाहतो. म्हणजे बघा, एखादा नेहमी आनंदी राहणारा म्हणतो की जीवन काय सुंदर आहे. तर निराश व्यक्ती म्हणते, छे! जीवन म्हणजे दु:खच दु:ख. एखाद्या ध्येयवाद्यासाठी जीवन आव्हान आहे. श्रीमंतांसाठी तो पैसा आहे तर गरिबांसाठी नुसती कटकट. अडचणींमध्ये अडकलेल्यांसाठी जीवन म्हणजे नुसती गुंतागुंत. तर मुद्दा असा की जसे जो जीवन जगतारे तसा जीवनाचा अर्थ लावतो. आपण असे म्हणूयात की, जीवन म्हणजे खूप काही घटनांचे मिश्रण, सुख-दु:खांची खाण आहे.

आपल्या प्रत्येकाच्या मनात, अंतरंगात एक नैसर्गिक शक्ती असते. त्या शक्तीनेच आपल्याला पृथ्वीवर धाडले आहे. त्यामुळे या शरीरात चैतन्य असेपर्यंत जगता आलेच पाहिजे. जीवन जगताना विचारांचे साम र्थ्य खूपच प्रभावशाली ठरते. थोर विचारवंत म्हणतात की विचार हेच जीवन आहे. विचारांचा परिणशम शरीरावर, जगणयवर घडत असतो. वाईट विचारांनी सुख नाहीसे होते तर आशावादी विचारांनी जीवनात आनंद निर्माण होतो. मनाला स्फुर्ती देणारे विचार शरीर व मनाला फायदेशीर ठरतात आणि जगण्यासाठी एक प्रकारची चालना देतात.

विचारांचे प्रभावशाली सामर्थ्य टिकवण्याकरता नकारात्मक विचारांकडे पाठ फिरवली पाहिजे. नकारात्मक विचारांनी जीवनात कडवटपणा येतो. निराशा येते. मन खचते. स्वत:वरचा विश्वास उडतो आणि जगण्याचे समार्थ्यच नाहीसे व्हायला लागते. सकारात्मक विचार जगण्यातील उत्साह, आनंद वाढवतात. तर कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याचे बळ देतात. म्हणून जगा पण सकारात्मक जगा.

■ दत्तात्रय वायचळ, पुणे
९९२३४८२२६४

**'चपराक' या साप्ताहिकाची मालकी व इतर संबंधीचे निवेदन**

तक्ता - ४ (नियम ८ अन्वये)

**प्रकाशनाचे ठिकाण :**
स्नेहल आर्टस्, शनिवार पेठ, पुणे - ३०

**प्रकाशन काल :** साप्ताहिक

**मुद्रकाचे नाव :** घनश्याम वसंतराव पाटील

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

**संपादकाचे नाव :** घनश्याम वसंतराव पाटील

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

**भागधारक :** घनश्याम वसंतराव पाटील

मी घनश्याम वसंतराव पाटील असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**दिनांक :** ३१ मार्च २०१६

**ठिकाण :** पुणे

**घनश्याम वसंतराव पाटील**
संपादक/मुद्रक/प्रकाशक

पान २ वरून...

## मराठी माध्यम, यशाचे माध्यम

अशा विना अनुदानित इंग्रजी माध्यम शाळांमधील बहुतेक शिक्षकांना रस्ते खोदणाऱ्या मजुरांपेक्षा किंवा अन्य रोजंदारी मजुरांपेक्षा कमी वेतन मिळते, प्रशिक्षण तर मिळतच नाही,

म्हणून तेथील शिक्षकांच्या शिकवण्यात कायम त्रुटी राहतात. या त्रुटींमुळे इंग्रजी माध्यम विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात मराठी माध्यम विद्यार्थ्यांच्या तुलनेत कमी यश मिळते. कमी यशाऐवजी अधिक यश मिळण्यासाठी मराठी माध्यमाची निवड हा अतिशय चांगला, सुरक्षित आणि लाखमोलाचा निर्णय ठरतो.

**मराठी भाषिक उन्नतीचा उज्ज्वल भविष्यकाळ -**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्याच्या काळात ज्या ७१ देशांना स्वातंत्र्य मिळाले त्यांनी शिक्षण, संशोधन, प्रशासन, व्यापारासाठी स्वभाषेचा वापर करून प्रगतीचा वेग वाढवला. भारतात स्वभाषेपेक्षा इंग्रजीला महत्त्व दिल्याने भारताच्या प्रगतीचा वेग कमी राहिला. भारत सरकार, महाराष्ट्र सरकार स्वभाषेला प्राधान्य देऊन इंजिनिअरिंग, मेडिकलसह सुमारे ३५० शास्त्रीय आणि तंत्रज्ञान आधारित अभ्यासक्रम भारतातील २२ अधिकृत भाषांमधून शिकवण्याची व्यवस्था येत्या काळात करणार आहे. महाराष्ट्रात असे सर्व अभ्यासक्रम मराठी माध्यमात उपलब्ध होतील. या सोयींचा लाभ घेण्यासाठी मुलांना शाळेत घालताना मराठी माध्यमात प्रवेश उपयुक्त ठरेल. गेल्या दहा वर्षांपासून महाराष्ट्रातील व्यवहारात, उद्योगात, शिक्षणात, सरकारी, खाजगी कामकाजात, भ्रमणध्वनी, संगणकावर मराठीवापर प्रचंड वाढला, आणि यापुढे सतत वाढेल. अशा मराठी वातावरणात प्रगतीसाठी मराठी माध्यमातील शिक्षणच उपयुक्त ठरेल. इंग्रजी माध्यम निवडून आणि मराठी वातावरणाशी विसंगत शिक्षण देऊन मुलांवर एक प्रकारे अन्याय होईल याची जाणीव पालकांनी यापुढे ठेवली पाहिजे.

एका सामाजिक संस्थेतर्फे मुंबई, कोलकाता, चेन्नई, दिल्ली येथील १४२ नामवंत शाळांमधील इ. ५ वी ते ७ वीतील ३२००० मुलांची चाचणी घेतली. इंग्रजी माध्यम विद्यार्थ्यांचे ज्ञान वरवरचे असून ते इतर माध्यमाच्या तुलनेत केवळ पाठांतरावर अवलंबून असल्याने त्यांची अभिव्यक्ती त्रोटक असते असे त्यात आढळले.

कुसुमाग्रज म्हणाले होते, ''भाषा मरता, देशही मरतो, संस्कृतीचाही दिवा विझे, गुलाम आणिक होवून, अपुल्या प्रगतीचे शिर कापू नका.'' नव्या काळात आपण म्हणू या, ''भाषा जगता, देशही जगतो, संस्कृतीचाही दिवा उजळे, भाषिक गुलामी टाळून, आपुल्या प्रगतीचा वेग वाढवू. भूगोलाने देश निर्माण होतो राष्ट्रप्रेम, देशाबाबत बांधिलकी भाषेमुळेच साकारते.

म. गांधी यंग इंडियाच्या १९२१ मधील लेखात म्हणाले, परक्या माध्यमामुळे बालकांचा मेंदू थकतो, बुद्धीला मांद्य येते म्हणून बालके केवळ पोपटपंची, घोकंपट्टी करतात. ते मुलभूत विचार आणि संशोधन करण्यास अपात्र बनतात. आपल्या ज्ञानाचा लाभ ते कुटुंबाला, समाजाला आणि देशाला देऊ शकत नाहीत. मी हुकुमशहा असतो, तर परभाषेतील शिक्षणाला बंदीच घातली असती.

मुलांचे शिक्षण चांगले होण्यासाठी परभाषेतील महागड्या शिक्षणापेक्षा स्वभाषेतील दर्जेदार शिक्षण आवश्यक हा कुसुमाग्रजांचा संदेश आपण अंमलात आणू या ! काही क्षेत्रात आवश्यक असलेले इंग्रजी भाषिक कौशल्य देखील मराठी माध्यमातच अधिक चांगले मिळते हे समजावून घेण्यासाठी आसपासच्या मुलांचे निरीक्षण करावे. खात्री पटल्यावर इंग्रजी माध्यमात असलेली आपली मुले मराठी माध्यमात हलवण्याचा नि:संकोचपणे विचार करावा.

**इंग्रजीबाबत गैरसमज**

गैरसमज १ : इंग्रजी जागतिक भाषा आहे. वस्तुस्थिती मात्र वेगळी असून इंग्रजी ही केवळ इंग्लंड या साडेचार कोटी लोकसंख्येच्या देशातील भाषा असून जगभरातील केवळ दोन कोटी लोकांची ती मातृभाषा असावी.

गैरसमज २ - इंग्रजी ही तंत्रज्ञानाची भाषा आहे. वस्तुस्थिती मात्र वेगळी असून जगातील मानवी इतिहासात आजवर विज्ञान, तंत्रज्ञानातील जितके नवे संशोधन झाले त्यातील ९९ % संशोधन इंग्रजी मातृभाषा नसलेल्या आणि शाळेत मराठी, हिंदी, तमिळ, बहामास, जपानी, चीनी मंदेरीन, फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश या आणि अशाच इंग्रजीपेक्षा प्रगत भाषेतून शिकलेल्या व्यक्तिंनी यशस्वीपणे केले आहे.

**आर्थिक आणि मानसिक ताण टाळा -**

प्रत्यक्ष शालेय शिक्षण वयाच्या सहा वर्षापासून द्यावे असे जागतिक शिक्षण तज्ञ सुचवतात. ज्या देशांचे अनुकरण करून भारतात इंग्रजी माध्यम शाळा चालविल्या जातात त्या देशांमध्येही सहा वर्षांपूर्वी प्रत्यक्ष शालेय शिक्षणाला सुरुवात केली जात नाही. केवळ पालक पैसे उधळायला तयार आहेत म्हणून अगोदर चार वर्षांच्या मुलांच्या के. जी. नावाच्या शाळा काढल्या गेल्या, नंतर आता दोन वर्षाच्या बालकांनाही शाळा नावाच्या बंदिस्त ठिकाणी अडकवले जाते आहे. जगभर अशास्त्रीय मानला जाणारी ही कृती भारतात इंग्रजी माध्यमाच्या आकर्षणापोटी रुजली. आईबाबा दोघे नोकरीवर, विभक्त कुटुंबे यामुळे मुलांना घरात ठेवण्यापेक्षा शाळेत अडकवलेले बरे या मानसिकतेचा लाभ घेऊन मुलांवर औपचारिक शाळेचा, त्यातूनही परक्या भाषेतून संवाद साधणे, स्वभाषा बोलल्यास कठोर शिक्षा असे अशास्त्रीय, अघोरी नियम पाळण्याची सक्ती असे अतिशय दुर्दैवी वातावरण बालकांना सहन करावे लागते. यामुळे मुलांवर भयंकर मानसिक ताण येतो. पालकांनाही यात आर्थिक ताण सोसावा लागतो. पालक कशीतरी पैशाची जमवाजमव करतात, तो ताण सोसण्याइतके ते मोठे असतात, पण बालकांना ज्या मानसिक ताणाला सामोरे जावे लागते त्यासाठी मुले सक्षम नसतात. पालकांवरील आर्थिक ताण आणि बालकांवरील मानसिक ताण हे दोन्ही ताण टाळण्यासाठी मराठी माध्यमाची निवड हा सोपा, योग्य, व्यवहार्य आणि लाभदायक उपाय आहे. ■

# सुप्रियाताई, आधी गुरं दावणीला बांधा!



■ भाऊ तोरसेकर
९७०२१३४६२४



**सध्या** राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये नेत्यांचा दुष्काळ पडला आहे काय? कारण खुद्द शरद पवार फारसे क्रियाशील नाहीत आणि मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार अजितदादा सिंचन घोटाळा चौकशीच्या भवितव्यामुळे मौन धारण करून बसले आहेत. छगन भुजबळ तुरूंगात गेल्याने त्याही आघाडीवर शांतता आहे. त्यामुळे सुप्रियाताई सुळेंना पदर खोवून आणि कंबर कसून मैदानात उतरावे लागलेले असावे. पक्षाच्या प्रवक्त्यांना बाजूला सारून ताईच सध्या किल्ला लढवताना दिसत आहेत. भुजबळांना अटक झाल्यावर त्यांनी 'सर्वांनाच अटक करा, आम्ही मराठे घाबरत नाही,' अशी जाहीर ग्वाही दिलेली होती. एकूण सध्या सुप्रियाताई राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पक्षश्रेष्ठी झालेल्या दिसत आहेत. त्यामुळे एकूण पक्षाच्या भूमिका व धोरणे त्यांच्या वक्तव्यातून उघड होतात, असे गृहीत धरायला हरकत नाही. म्हणून मग बारामतीमध्ये त्यांनी सरकारला दिलेला इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीरपणे घेतला पाहिजे. दुष्काळ व पाणीटंचाई अशा दोन समस्यांनी ताई खूप व्याकुळ आहेत. त्यावर तात्काळ उपाय झाले नाहीत, तर थेट मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यात गुरे आणून बांधायची धमकी ताईंनी दिलेली आहे. ताईंनी तसा निर्धार केलेला असेल, तर त्या तडीसही घेऊन जातील याविषयी शंका बाळगण्याचे कारण नाही, पण गुरे कुठे मोकाट सुटली असतील, तर आधी शोधावी लागतील, त्याचे काय? त्यांची काही गुरे मोकाट झाली, म्हणून कोंडवाड्यात टाकावी लागली त्याचे स्मरण ताईंना कसे रहात नाही? सरकारने त्या गुरांकडे दुर्लक्ष केले म्हणून अखेर कोर्टाला त्यांचा बंदोबस्त करावा लागला. भुजबळ यांच्या विरोधातली कारवाई सरकारने केलेली नाही, तर कोर्टाने नेमलेल्या खास चौकशी पथकामुळे त्यांना गजाआड जावे लागले आहे. जितेंद्र आव्हाड यांना तर अनेकांच्या वावरातून हाकलून बाहेर काढण्याच्या कटकटी सातत्याने होत आहेत.

मध्यंतरी सांगली येथे आव्हाड यांनी अश्लाघ्य भाषा वापरली आणि त्यांना व्यासपीठावर घुसून काही लोकांनी मारहाण केली होती. त्यानंतर अनेकजागी त्यांच्या अशाच आगावूपणामुळे खुद्द अजितदादांच्या नाकी दम आला होता. विधानसभेत चिक्की विकायचा उद्योग आव्हाडांनी केला आणि त्यात तेलगीच्या विषयाला फोडणी दिल्याने भुजबळांना संताप अनावर झाला होता. तेव्हा दादांना हस्तक्षेप करून आव्हाडांना वेसण घालावी लागली होती. आता त्यांनी पुण्याच्याच फर्ग्युसन कॉलेजात धमाल केली म्हणून प्रकरण हातघाईवर आले. त्यात पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला होता. वास्तविक फर्ग्युसन कॉलेजचा मामला विद्यार्थ्यांचा होता, तिथे आव्हाडांना जायचे काही कारण नव्हते, पण भटक्या गुरांना कुठेही हिरवाई दिसली, मग त्यात तोंड खुपसण्याची सवय असते. आव्हाडांचे तसेच काहीसे झालेले आहे. अशा लोकांना वेळच्या वेळी लगाम लावता येत नसेल, तर घरातच दावणीला बांधणे भाग असते, हे शेतकरी म्हणून करोडोचे पीक दुष्काळातही काढणाऱ्या 'शेतकरी' सुप्रियाताईंना माहिती असेलच. अन्यथा त्यांनी दुष्काळातल्या गुरांना चारा नाही म्हणून वर्षा बंगल्यात गुरे आणण्याची धमकी कशाला दिली असती? मात्र तसे करण्यासाठी आपली पाळीव गुरे निदान आपल्याच गोठ्यात वा दावणीला बांधलेली असावी लागतात, ह्याचा ताईंना पुरता विसर पडलेला दिसतो. अन्यथा फर्ग्युसन कॉलेजच्या आवारात आव्हाड धुमाकुळ घालत असतानाच ताईंनी मुख्यमंत्र्यांना असली धमकी कशाला दिली असती? चारा वा पाण्याची टंचाई अकस्मात उद्भवलेली नाही. ताईंच्याच गुरांनी महाराष्ट्रालाच चरायचे कुरण समजून 'चर आणि खा' असा पंधरा वर्षे चरखा फिरवला, त्याचा हा दुष्परिणाम आहे. या कालावधीमध्ये चरताना आणि खाताना थोडेफार तरी उगवले पाहिजे, याचे भान राखले गेले असते तर आज ही वेळ आली असती काय?

ताईंना आठवत नसेल, पण तीन वर्षापूर्वी सोलापुरच्या काही शेतकऱ्यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर धरणे धरून सोलापूरला पाणी देण्यासाठी आंदोलन छेडले होते. तेव्हा ताईंची गुरे काय करत होती? त्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या धरणात पाणीच नाही, तर काय करायचे अशी 'लघुशंका' ताईंच्या दादानेच व्यक्त केलेली होती. मग ताईंच्या गुरांना तेव्हा कुठला चारा व पाणीपुरवठा होत राहिला? तेव्हा ताई कशाला गप्प होत्या? गुरे किंवा चारा असली भाषा बोलले, म्हणजे कोणी शेतकरी होतो अशी ताईंची समजूत असेल, तर गोष्ट वेगळी! अन्यथा आज इतक्या तावातावाने बोलणाऱ्या सुप्रियाताई तेव्हाही घराबाहेर पडून आक्रोश करताना दिसल्या असत्या, पण दादांची लघुशंका असो किंवा शेतकऱ्यांच्या आत्महत्या असोत, ताईंनी कधी चकार शब्द उच्चारला नव्हता. आज त्यांना दुष्काळ दिसतो आहे, भुकेलेली गुरेही दिसत आहेत; पण त्यासाठी मागल्या दीडवर्षात ताईंनी वा त्यांच्या पक्षाने किती आवाज उठवला? सत्तेत जाऊनही त्याविरुद्ध शिवसेनाच ओरडा करते आहे. त्यांनीही सरकारच्या विरोधात आपल्या सोबत यावे, असे आवाहन ताई करतात. हरकत नाही! पण सोबत कोणी कोणाच्या जावे? सेना सत्तेत गेली तरी पहिल्या दिवसापासून दुष्काळाच्या विरोधात बोंब मारते आहे. तेव्हा ताईंचे आव्हाड चिक्की विकत होते. सांगलीत जाऊन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा उद्धार करीत होते. ठाण्यात इशरत जहानची स्मारके उभी करीत होते. मोकाट सुटलेल्या गुरांसारखे वागत होते, त्यांना लगाम लावून शेतकरी प्रश्नाकडे वळवण्यापेक्षा तीर्थरुपांनी त्या मोकाटपणालाच फुले शाहू आंबेडकरांचे कार्य ठरवणारे प्रमाणपत्र लिहून मुख्यमंत्र्यांना इशारा दिला होता. या दीर्घकाळात सत्तेतली शिवसेनाच सरकार विरोधात बोंबा ठोकत होती. तेव्हा सोबतीचा विषय असेल, तर ताईंनीच सेनेच्या सोबत येतो म्हणायला हवे ना?

आज मुख्यमंत्र्याला धमक्या देण्यापेक्षा मागल्या पंधरा वर्षात आपल्या दादालाच इशारे देऊन काही हालचाल केली असती, तर फडणवीस वर्षा बंगल्यावर वास्तव्य करायलाही जाऊ शकले नसते, की ताईंना उन्हातान्हात इशारे देत फिरावे लागले नसते. व्यापारी आणि शेतकऱ्यांना पंतप्रधान व मुख्यमंत्री साधी भेटायला वेळ देत नसल्याची तक्रारही ताईंनी त्याच भाषणात केली आहे. यासारखा विनोद नाही. कारण देशाचे पंतप्रधान तेरा महिन्यापूर्वी बारामतीत आलेले होते आणि त्यांनी जाहिरपणे 'आपण बारामतीकरांच्याच सल्ल्याने कारभार करतो' असे ओरडून सांगितले होते. 'असा आठवडा जात नाही की शरद पवारांशी आपला संपर्क होत नाही,' असे मोदींनीच सांगितले होते ना? त्यांच्या पाठोपाठ फडणवीसही बारामतीला येऊन गेले. तिथे जाणाऱ्या प्रत्येकाने आपण पवारांच्याच सल्ल्याने चालत असल्याचे कथन केले आहे. मग इतकी भीषण परिस्थिती आली असेल, तर त्याला मुख्यमंत्री व पंतप्रधानांचे सल्लागारच जबाबदार असतील ना? सुप्रियाताई त्या सल्लागाराला जाब विचारण्यासाठी भेट मिळत नाही, अशी तक्रार आहे काय? तो सल्लागार तुम्हाला घरबसल्याही भेटू शकतो, केव्हाही वेळ देऊ शकतो. तुम्ही तसा प्रयत्न तरी कधी केला आहे काय? त्या दोघा मोठ्या कारभाऱ्यांना तुमच्या पिताजींची खिदमत करण्यातून सवड झाली, तर शेतकरी वा व्यापाऱ्यांना वेळ देणार ना? गरीब गरजूंसाठी त्यांना उसंत मिळत नाही आणि बारामतीला मेजवान्या झोडायला वेळ मिळत असेल, तर तिथल्या तिथे त्यांना खडसावण्याची संधी पुन्हा सुप्रियाताईंना सोडून दुसऱ्या कुणाला होती काय? पण तिथेही ताई निष्क्रियच राहिल्या. थेट तोंडावर जाब विचारण्याची संधी सोडून, अशी भाषणे देण्यातले नाटक कोणाच्या लक्षात येत नाही, अशी ताईंची समजूत आहे काय? बाकी गोष्टी सोडून द्या ताई, शक्य झाल्यास तुमची मोकाट झालेली गुरे आधी दावणीला आणून बांधा. निदान वर्षा बंगल्यावर जायचे असेल, तेव्हा जागेवर मिळायला हवीत ना? ■

# सन अठराशे सत्तावन्न

## एका ऐतिहासिक उठावाच्या सर्व बाजू सांगणारा ग्रंथ

**अठराशे** सत्तावनचा उठाव. त्याबद्दल साधारणपणे एकच मतप्रवाह आढळतो. तो स्वातंत्र्यलढा होता असं ते मत. तो उठाव मोठा होता यात शंका नाही; मात्र तो स्वातंत्र्यलढा होता का? त्याबद्दल वेगवेगळी मतं व्यक्त केली जातात. बेचाळीसचा उठाव स्वातंत्र्यलढा होता. त्यानंतर आझाद हिंद सेनेने केलेला उठावही स्वातंत्र्यलढाच. ब्रिटिशांबद्दल खूप संताप होता, म्हणूनच अठराशे सत्तावन्नचा उठाव झाला ही गोष्ट मात्र खरी आहे. या उठावाला असंख्य बाजू आहेत. शेषराव मोरे म्हणतात त्याप्रमाणं, एक बाजू 'जिहाद'ची देखील आहे. ना. के. बेहऱ्यांचा 'सन अठराशे सत्तवन्न' हा ग्रंथ या उठावाच्या सर्व बाजू मांडतो. ४८९ पानी हा ग्रंथ. यात सत्तावन्नमध्ये घडलेला भयानक रक्तपात, बंडखोर व ब्रिटिश दोघांनी आखलेले डावपेच, त्यामागचं राजकारण अशा सर्व बाबी येतात. हा उठाव दडपताना ब्रिटिशांनी दाखवलेली राक्षसी वृत्ती भयानक होती, तसंच बंडखोरांकडूनही अत्यंत अमानवी व हिंस्त्र हत्या घडल्या. त्याचा संपूर्ण लेखाजोखा ग्रंथात आला आहे.

ब्रिटिशांनी भारत जिंकून घेतला तोच मराठ्यांपासून. औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्यानंतर मराठ्यांनी सगळा भारतच ताब्यात घेतला होता. दिल्लीच्या मुघल बादशाहीचं प्राणपणानं रक्षण देखील केलं होतं. ग्रंथाच्या सुरूवातीला लेखकानं हे ऐतिहासिक सत्य सांगितलं आहे. नंतर लेखक १८५७ च्या उठावाची कारणं सांगतो. लॉर्ड डलहौसीची लोभी वृत्ती यामागं होती. तो १८४८ मध्ये भारताचा गव्हर्नर जनरल झाला. भारतातली अनेक संस्थानं त्याच्या डोळ्यात खुपू लागली. आधी साताऱ्याच्या प्रतापसिंह भोसल्यांचं राज्य इंग्रजांनी गिळलं. दि. २९ मार्च १८४९ रोजी डलहौसीनं पंजाबचं राज्य खालसा केलं. तिथं राजा रणजितसिंहाचं राज्य होतं. रणजितसिंहाचा मुलगा दिलीपसिंह. त्याला तर ब्रिटिशांनी ख्रिस्तीच केलं. डलहौसीनं पुढं मराठ्यांच्या तंजावर येथील राज्याची देखील तीच गत केली. नागपूरच्या भोसल्यांचं राज्य देखील डलहौसीच्या कारस्थानांना बळी पडलं. ब्रिटिश कापडाचा व्यापार करत. त्यासाठी त्यांना मुबलक कापूस हवा असे. यासाठी त्यांनी वऱ्हाड व मध्य प्रांतावर कब्जा केला. दि. २ ऑगस्ट १८५४. या दिवशी डलहौसीनं झांशीचं राज्य खालसा केलं. दि. ४ फेब्रुवारी १८५६. या दिवशी लखनौच्या संपन्न राज्याचा देखील घास घेण्यात आला. इ. स. १७१४ ते १८१८ हा साधारण १०४ वर्षांचा पेशवाईचा काळ. १८१८ साली पेशवाई नष्ट झाली व ब्रिटिशांनी मराठ्यांना सरळ चेपायला सुरूवात केली. साम, दाम, दंड, भेद! ब्रिटिशांच्या राजकारणाचं सूत्रच होतं हे. ब्रिटिशांची व विशेषः डलहौसी या महाभागाची ही वृत्ती असंतोषाला कारणीभूत ठरत गेली. ब्रिटिशांचं हे हातपाय पसरणं लेखकानं ग्रंथाच्या सुरूवातीलाच खूप तपशीलानं सांगितलं आहे. पेशवाईच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी भारतभर झेंडे रोवले होते. अटकेपर्यंत राज्य नेलं होत; मात्र नंतर इस्ट इंडिया कंपनीच्या राजकारणानं सर्वांवरच कडी केली. त्यात दुसरा बाजीराव पेशवा. तो घरबुडवा निघाला. त्यानं १८०२ साली वसई येथे ब्रिटिशांशी तह केला. तो दिवस होता ३१ डिसेंबर. त्या दिवसापासून मराठ्यांच्या राज्यातच भांडणं व मतभेद सुरू झाले. ब्रिटिश या सगळ्यांचा फायदा घेत गेले. राजकारण हा शेवटी बुद्धिबळाचाच पट असतो. हे बुद्धिबळाचे खेळ बेहऱ्यांच्या या ग्रंथात पानोपानी वाचायला मिळतात. ग्रंथ कुठेही बोजड नाही. कंटाळवाणा तर नाहीच. अभ्यासपूर्ण व वाचनीय असा तो आहे. बेहऱ्यांनी हा ग्रंथ लिहिला १९२७ साली. त्यानंतर ११ वर्षांनी त्याची दुसरी आवृत्ती निघाली. मग थेट २००७ साली तिसरी आवृत्ती. ती काढली पुण्याच्या श्रीविद्या प्रकाशनने. ते १९३७ साल होतं. त्यासाली स्वतः स्वातंत्र्यवीर सावरकरांनी बेहऱ्यांच्या या ग्रंथाची स्तुती केली होती. 'हा ग्रंथ खऱ्या इतिहासाला धरून आहे' असे सावरकरांचे उद्‌गार होते. ग्रंथ वाचताना सावरकरांचे हे उद्‌गार आपल्याला आठवत राहतात.

दिल्ली, लखनौ, कानपूर व झांशी ही सत्तावनच्या उठावाची प्रमुख केंद्रे होती. यात लखनौ वगळता इतरत्र ब्रिटिश बायका व मुलांच्या कत्तली झाल्या, असा उल्लेख ग्रंथात आढळतो. त्यात सर्वात भीषण कत्तल कानपुरला झाली. त्याचा सूड म्हणून ब्रिटिशांनी कानपूर व आसपासच्या परिसरात दहा हजार भारतीयांच्या कत्तली घडवून आणल्या. वाटेल ती किंमत देऊन ब्रिटिशांना हा उठाव दडपायचा होता. त्यासाठी त्यांनी जंग जंग पछाडलं. आपली सगळी बुद्धी, शक्ती वापरली. त्याची सगळी वर्णन बेहऱ्यांनी दिली आहेत. दिल्ली जिंकून घेताना ब्रिटिशांचे ६१ लाख रूपये खर्च झाले व ३८३७ सैनिक मरण पावले; मात्र ब्रिटिशांनी ती किंमत चुकती केली. पुढं त्यांनी झांशी जिंकून घेतलं तेव्हा सूडबुद्धीनं पाच हजार जणांना ठार मारलं. झांशीतली लढाई घनघोरच होती. झांशीच्या राणीनं १७ दिवस किल्ला लढवला. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' अशीच स्थिती त्या काळात झांशीच्या राणीची होती. या चार शहरांमधली बंडाची आग भयंकर होती. त्याला उघड राज्यक्रांतीचं स्वरूप आलं होतं. ही आग विझवायला ब्रिटिशांना एक वर्ष लागलं.

हा उठाव का झाला? त्याची कारणं बरीच होती; मात्र ठिणगी पडली ती एका घटनेमुळं. त्यावेळी कोलकत्याहून आठ मैलांवर 'दमदम' ही लष्करी छावणी होती. तिथं ब्रिटिशांनी काडतुसे तयार करण्याचा कारखाना सुरू केला होता. त्यावेळी ब्रिटिश फौजेतील शिपाई 'ब्राऊनबेस'नावाची बंदुक वापरत असत. या बंदुकीत काडतूस भरताना ते दातांनी तोडून बंदुकीत भरावं लागे. या काडतूसाला गाईची व डुकराची चरबी चोपडली जाते अशी अफवा उठली. ब्रिटिशांनी देशी शिपायांची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला; मात्र काडतूस वापरताना आपला धर्म बाटेल या विचारानं हिंदू व मुसलमान शिपाई अस्वस्थ झाले. ते आतल्या आत घुसमटू लागले व दि. २९ मार्च १८५७ रोजी बराकपूर येथे सर्वप्रथम मंगल पांडे बिथरला. त्यानं एका ब्रिटिश अधिकाऱ्यावर गोळी झाडली. तो अधिकारी बचावला; मात्र त्या गोळीनं '१८५७'चा अध्याय सुरू झाला. तो संपायला पुढं दोन वर्षे लागली. काय घडलं या दोन वर्षात? तर उत्तर भारतात अक्षरशः हलकल्लोळच माजला होता. बेहरे यांनी या सगळ्या घटना सांगितल्या आहेत. त्यात लढाया, राजकीय डावपेच सगळं काही आहे. त्यावेळी भारतात इस्ट इंडिया कंपनी राज्य करत होती. तिच्या फौजेत अयोध्या, कानपुर, अलाहाबाद, वाराणसी टापूतील पूरभैयांचा खूप भरणा होता. या पूरभैयांच्या पलटणी बिहार, मध्य प्रांत, संयुक्त प्रांत, वायव्य प्रांत, मध्य हिंदुस्थानातील संस्थानं, पंजाब अशा सर्व उत्तर हिंदुस्थानभर पसरल्या होत्या. उठावात या पलटणी सर्वात पुढं होत्या. मुसलमान शिपाई तर उठावात सामील होतेच. अशावेळी ब्रिटिशांनी आपल्या फौजेतील शीख व गुरखा पलटणींना आपल्याकडे वळवून घेतले व केवळ त्यांच्या मदतीनेच उठाव दडपला. शीख व गुरखे विरोधात गेले असते तर? तर ब्रिटिश अक्षरशः मेले असते; मात्र ते विरोधात गेले नाहीत त्याला ऐतिहासिक कारणं होती. एक तर शिखांना त्यावेळी मोगल बादशाही मान्य नव्हती. बंडखोरांनी तर मोगल बादशहालाच आपला राजा मानलं होतं. शिखांचे गुरूगोविंदसिंगांसारखे काही धर्मगुरू पूर्वी मोगल बादशहाकडून मारले गेले होते. त्यामुळे शिखांना या बादशाहीविरूद्ध आतून तिटकारा होता. आणखी एक कारण होतं. १८४९ साली शीख-इंग्रज युद्ध झालं होतं. त्यावेळी पूरभैय्या व मुसलमान पलटणींनी शिखांविरूद्ध लढून इंग्रजांना विजय मिळवून दिला होता. त्याचाही राग शिखांच्या मनात होता. गुरख्यांची अवस्था अशीच होती. पूर्वी नेपाळ देखील ब्रिटिशांनी जिंकून घेतला होता तो या पूरभैय्या व मुसलमान पलटणींच्या बळावरच. आता गुरख्यांना त्या घटनेचा सूड घ्यायचा होता. यातली ब्रिटिशांची चलाखी व मुत्सद्देगिरी लक्षात घेण्यासारखी होती. ब्रिटिश भारतीय संस्थानं खालसा करत होते. दुसरीकडे या संस्थानिकांना एकमेकांविरूद्ध कोंबड्यासारखं झुंजवत होते; मात्र सगळ्यांनी एकत्र येऊन ब्रिटिशांना बुडवावं असं कुणालाही वाटलं नाही. नेपाळचा राजा जंगबहाद्दूर. तो देखील ब्रिटिशांच्या मदतीला धावला. त्याचं कारण वर आलंच आहे. प्रत्येकाला आपापले हेवेदावे साधायचे होते. या हेवेदाव्यांचा परिणाम एकमेकांचे रक्त सांडण्यात झाला. यासंदर्भात एक पत्र फार बोलकं आहे. ते लिहिलंय लॉर्ड लॉरेन्सनं सर फ्रेडरिक करी याला. लिहिलं १८५८ मध्ये. तो म्हणतो, ''हॅड द पंजाब गॉन, वुई मस्ट हॅव बीन रूइंड.'' पंजाब बिथरला असता तर सर्वनाश अटळ होता असं तो म्हणतो. बंडाच्या काळात राजपुताना (राजस्थान) शांतच राहिला व महाराष्ट्रातही बंडाचं मोठं वारं शिरलं नाही. झांशीची राणी, नानासाहेब पेशवे, तात्या टोपे हे मराठे तेव्हा लढले. ब्रिटिशांच्या विरोधात त्यांनी प्राण पणाला लावले; मात्र त्यांच्या सैन्यातली एकूण मराठ्यांची संख्या कमीच होती. रजपूत शांत राहिले ते त्यांच्या काहीशा स्थितीप्रिय वृत्तीमुळं. सत्ताधारी हे मोघल असोत, मराठे असोत वा ब्रिटिश, सत्तेपुढं लीन रहायचं ही ती स्थितीप्रियता. दुसरीकडे बंगाल व मद्रास प्रांत देखील शांतच राहिले.

मंगल पांडे ते तात्या टोपे असा देखील हा सगळा प्रवास आहे. मंगल पांडेला ब्रिटिशांनी फाशी दिलं. त्या फाशीची तारीख मात्र ग्रंथात दोन ठिकाणी वेगवेगळी देण्यात आली आहे. पृष्ठ क्र. १५५ वर ती ६ एप्रिल १८५७ आहे तर पृष्ठ क्र. २०७ वर दि. ८ एप्रिल १८५७. मंगल पांडे नंतर बरोब्बर दोन वर्षांनी ब्रिटिशांनी तात्या टोपेंना फाशी दिली. तो दिवस होता दि. १८ एप्रिल १८५९.

बेहऱ्यांच्या मते उत्तर हिंदुस्थानातील या ऐतिहासिक बंडात हिंदुंपेक्षा मुसलमानांचा सहभाग जास्त होता. कारण त्यांनी ब्रिटिशांविरूद्ध तेव्हा जिहादच पुकारला होता. शेषराव मोरे यांनी नंतर हेच सांगितलं. 'लखनौ शहर बंडखोरांनी एखाद्या किल्ल्याप्रमाणे लढवलं' असं बेहऱ्यांनी म्हटलंय. लखनौमधील बंडखोर हे सगळेच मुसलमान होते. त्यांच्या शौर्याचं जबरदस्त कौतुक सावरकरांनी देखील आपल्या '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथात केलेले आहेच.

ग्रंथात मथुरा, बरेली, आग्रा, शहाजहानपुर, वाराणसी, अलाहाबाद, ग्वाल्हैर, इंदौर, महू, लाहौर, पेशावर, नझफगड येथील उठावांची देखील माहिती देण्यात आली आहे. 'सत्यासारखा धर्म नाही' असं बेहेरे एकेठिकाणी म्हणतात. त्यामुळं ते हा इतिहास सांगताना सत्य घटना सांगण्यावर भर देतात. बेहऱ्यांनी दोन उदाहरणे सांगितली आहेत. त्यावरून ही गोष्ट लक्षात यावी. एका ब्रिटिश अधिकाऱ्याने या बंडाच्या धुमश्चक्रीत वीस हजार निरपराध स्त्री-पुरूषांचे प्राण वाचवले. ही घटना झांशीतली. दुसरीकडे सर जॉन के, लॉर्ड कॅनिंग, एडवर्ड थॉमसन ही ब्रिटिश मंडळी सत्यच सांगतात. ब्रिटिशांचे राक्षसी अत्याचार सांगताना ही मंडळी मागेपुढे पाहत नाहीत. त्यांची मतं बेहऱ्यांनी दिली आहेत.

बेहऱ्यांच्या मते त्याकाळी एकराष्ट्रीयत्वाची भावना भारतात नव्हती. १८८५ साली काँग्रेसची स्थापना झाली. बेहऱ्यांच्या मते त्यानंतर भारतात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. ग्रंथात १८५७-५८च्या वेळचा भारताचा नकाशा आहे. त्यातून भुगोल तर समजतोच; पण ऐतिहासिक ग्रंथ नकाशांमुळे नीट समजायला मदत होते. काही छायाचित्रे ग्रंथात आहेत. त्यातील कुंवरसिंह, झांशीची राणी, नानासाहेब पेशवे, बहाद्दूरशहा जफर, बेगम झिनत महल, तात्या टोपे यांची छायाचित्रे आपल्याला भूतकाळात खेचून नेतात. एकूणच १८५७ च्या उठावाचा समतोल अभ्यास या ग्रंथातून आला आहे.




- **लेखक :** नारायण केशव बेहेरे
- **प्रकाशक :** श्री विद्या प्रकाशन, पुणे (०२०-२४४५८४५५)
- **पृष्ठे :** ४८९, **मूल्य :** ३००/-

**■ महेश मांगले :** ९८२२०७०७८५

# उजळणी



**आमच्या** लहानपणी आम्ही गल्लीत सगळी मुलं एकत्र येऊन गोट्या, विटू दांडू, डबडा ऐसपैस खेळायचो. (आजकालच्या पोरांना ही नावं विचित्र वाटत असतील पण तुमच्या आईबापांना विचार. या खेळात जी गंमत यायची ना ती तुमच्या व्हीडिओ गेम्स मध्ये अजिबात नाही.) सुताराकडून खास दहा पैशांचा दांडू तासून आणला जायचा नि पाच पैशाला दोन्ही बाजूला टोकदार असणारी विटी... डबडा ऐसपैस म्हणजे लपाछपीचा एक प्रकारच... जुन्या लहानपणाच्या दिवसांची उजळणी सुरू झाली की सगळं बालपणच उजळतं आणि वाटतं खरोखरच बालपणीचा काळ सुखाचा.

गतायुष्याची उजळणी करायचा माणसाला छंदच असतो आणि सध्याच्या काळापेक्षा भूतकाळ बरा वाटायला लागतो. न जाणो कदाचित भविष्यकाळ एवढा कठीण असेल की आजचे दिवस बरे वाटायला लागतील. उजळणी म्हटलं की आठवतो गणिताचा तास. सरांनी बे एक्क बे म्हणायचं आणि त्यांच्या पाठोपाठ सगळ्या मुलांनी म्हणायचं. सगळे पाढे वर्गातच पाठ होऊन जायचे. पाठांतराची चाचणी घेतली जायची आणि न येणाऱ्याला बाकावर उभं रहायची शिक्षा मिळायची वा अंगठे धरून उभं रहायला सांगितलं जायचं. आजकाल या शिक्षा बंद झाल्या असाव्यात वा एवढीशी शिक्षा केली तरी पालक जाब विचारतात, 'आमच्या चिंटूला मारायचं नाही'. पूर्वीचे पालक सांजायचे, 'बडवा पण घडवा!'

बालपणातील उजळणी तरूणपणी कामी येते आणि आयुष्यात स्थिर व्हायला मदत करते. नोकरी करतानाचा काळ येणाऱ्या अनेक अडचणी, संकटं, प्रापंचिक समस्या... खरं तर ह्यांची उजळणी सुद्धा नको वाटते. दुरदर्शनवरच्या भडक मालिका पाहता-पाहता मन कधी भूतकाळात जातं आणि आठवतो माजघरातला कंदील. तो जळणाऱ्या वातीचा वासदेखील वातावरण मंगल करून टाकायचा. देवघरापाशी मंदपणे तेवणारी समई आणि धुरांची वलयं सोडणारी सुवासिक उदबत्ती, जोडीला आईचा शुभंकरोतीचा स्वर आणि त्यापाठोपाठ सर्व भावंडांचा उजळणींचा सामुदायिक स्वर. मित्रांनो तुम्ही-आम्ही हे अनुभवलय. ज्याची उजळणी आम्ही नेहमी करतो ते आजकालच्या मुलांच्या नशिबात नाही. अर्थात त्याचं गांभिर्यही कदाचित त्यांना पटणार नाही.



शब्दतरंग

सदानंद भणगे, नगर
९८९०६२५८८०

आयुष्याच्या संध्याकाळी कधी उभ्या आयुष्याच्या उजळणीला सुरूवात केली तर काय जाणवत असेल? बऱ्याचशा गोष्टी करायच्याच राहून गेल्या. दिवस मुठीतल्या वाळूसारखे भूळूभूळू वाहतच गेले आणि उगाचच कुणाला कधी दुखावलं, उगाचच कधी कुणाशी वाईट वागलो, पण तेव्हा वेळही निघून गेलेली असते आणि वाईट वाटूनही उपयोग नसतो. उजळणी करतानाही नशिबाला दोष देण्यात अर्थ नसतो. गोष्टी घडत जातात. नशिबात असेल तसंच घडणार. त्या प्रसंगात तसं वागायची बुद्धी देवंच देतो ना?

एक साप करंडीत आखडून बसल्याने वेदनेने त्रस्त झाला होता. भुकेनेही व्याकूळ झाला होता. बाहेर पडण्याची आशा त्याने सोडूनच दिली होती. तेवढ्यात रात्रीचं काहीतरी खायला मिळेल या आशेनं एक उंदिर ती टोपली कुरतडून आत शिरला आणि नेम का सापाच्या तोंडात शिरला. साप त्याला खाऊन तृप्त झाला आणि त्याने पाडलेल्या छिद्रातूनच बाहेर निघून गेला. थोडक्यात दोघांच्या नशिबात तसंच घडायचं होतं. जगण्याच्या आशेपायी हिंडणाऱ्याला मृत्यू दिसतो तर मृत्यू दिसणाऱ्याला जीवदान मिळतं. गतकाळातल्या प्रसंगाकडे या नजरेने पाहिलं तर निदान होणारं दुःख तरी कमी होईल.

आजकालचे विद्यार्थी धड्यांची उजळणी करताना दिसत नाहीत. वारंवार उजळणी, पाठांतर केल्याने पूर्वीच्या कविता आजही आम्हाला मुखोद्गत आहेत पण आजकालचा अभ्यास म्हणजे २१ अपेक्षित आणि परिक्षेच्या उंबरठ्यावर... असे अपेक्षितच जर विचारणार असतील तर वर्षभर शिकायचं कशाला आणि त्याची उजळणी तरी करायची कशाला?

संगणकाच्या आजच्या युगात बेरीज, वजाबाकी, उजळणी या गोष्टींना महत्त्व राहिलं नसलेही, पण आयुष्याच्या कमाईचं गणित सोडवताना मात्र प्रेमाची बेरीज, द्वेषाची वजाबाकी आणि परोपकाराची उजळणी ह्यांचीच साथ घ्यावी लागते आणि ते सूत्र कोणत्याच 'प्रोग्रॅम'मध्ये टाकता येणार नाही. कुठलाच संगणक ते गणित सोडवू शकणार नाही कारण मानवी मेंदू जशी उजळणी करू शकतो (जी आयुष्याला उत्साही बनवते) तशी संगणक करू शकणार नाही. ■

# शिक्षा

**सुजाता** दिसली... बऱ्याच दिवसांनी... तिचं माझ्याकडे अजिबात लक्ष नव्हतं. ती झपझप चालत होती. पुढे गेल्यावर तिने मागे वळून पाहिलं... नेमकी मी तिच्याकडेच पाहत होती. दोघींची नजरानजर झाली. क्षणभर तिचे डोळे चमकले पण लगेच ती पुढे निघून गेली. मग मलाही वाटलं. 'छे, ही सुजाता नसणार!' एव्हढी नजरानजर झाली पण तिने काही ओळख दाखवली नाही आणि सुजातापेक्षा ही बाई जरा प्रकृतीने रोड वाटली. सुजाता असती तर अशी पाहून न पाहिल्यासारखी मुळीच करणार नाही आणि सुजाताची राहणी एकदम टिपटॉप. जाऊ दे, एका चेहऱ्याची जगात सात माणसं असतात. तसा कदाचित प्रकार असेल. म्हणून मग मीही माझ्या रस्त्याला लागले. नेमके पुढच्या आठवड्यात 'ती' तिथेच दिसली. मग मात्र मीच झपझप तिच्याजवळ गेले, सुजाताच होती. मला जरा वाईट वाटलं, मैत्रिण असून मला टाळत होती, पाहून न पाहिल्यासारखं करत होती. मी मैत्रिच्या नात्याने लटक्या रागाने तिला जाबही विचारला. भर रस्त्यात असूनही तिनं हुंदका दिला आणि मला मिठीच मारली. ती मला खूप दिवसांनी भेटत होती. जाणवलं की बरंच काही घडून गेलंय.



सुवर्णाक्षरे



सुवर्णा जाधव, मुंबई
९८१९६२६६४७

जवळच असणाऱ्या हॉटेलमध्ये तिला नेलं. चहा मागवला. नंतर काही वेळाने ती जरा नॉर्मल वाटली. मी म्हटलं, 'ठीक आहेस ना? आणि काय अवतार करून घेतलास? तूच का ती टापटीपीचा आग्रह धरणारी. काय झालंय काय तुला?'' सुजाताने दीर्घ श्वास घेतला आणि सांगू लागली ते भयानक होती.

''अगं मला माझंच तोंड कोणाला दाखवावसं वाटत नाही. जगावसही वाटत नाही.'' निराशा तिच्या शब्दाशब्दातून टपकत होती. मग मीच म्हटलं, ''तुला सांगावसं वाटत नसेल. त्रास होत असेल तर सांगू नकोस.'' त्यावर सुजाता म्हणाली, ''नाही... नाही... अगं माझं मन मोकळं करण्याची गरज आहे. ह्या गोष्टी मनात साठून साठून त्याचाही त्रास व्हायला लागलाय. मला आता बोलू दे.''

''माझा नवरा तुरूंगात आहे.'' मध्यमवर्गीय माणूस प्रतिष्ठेला जपतो. त्यामुळे तिची मनःस्थिती लक्षात आली. ''तुरूंगात जाण्याएव्हढं काय केलं?'' मी विचारल्यावर तिने सांगितलं, ''अशीच बाचाबाची झाली. ह्यांचा स्वभाव तापट. साधं भांडण विकोपास गेलं आणि रागाच्या भरात त्यांनी त्या भांडणाऱ्याच्या डोक्यात जोरात काठी मारली. तो खाली कोसळला. ते कधीच न उठण्यासाठी. सारं क्षणार्धात संपलं. त्याच्या खुनाच्या आरोपात हे तुरूंगात आहेत.'' मी सुन्न झाले. कसं सांत्वन करणार? काय बोलणार? ''मला आधी नोकरी करू दिली नाही. नातेवाईक फिरकत नाही. खुन्याची बायको म्हणून कोणी उभं करीत नाही. मुलं पण कोमेजून गेलीत. सगळं आयुष्यच बदललं आमचं!''

तो तुरूंगात आहे. तसा तो वाईट नाही. रागाच्या भरात गुन्हा घडला. त्याला आता याचा खूप पश्चाताप होतो, पण वेळ निघून गेली. आजूबाजूला त्याच्या वेगवेगळ्या थरातलं कैदी. कोलमडून गेलाय, पण इलाज नाही. तारखा पडतात. पाहू... पण तो सांगायला तुरूंगात आहे. शिक्षा भोगतो पण खरी शिक्षा तर आम्हीच भोगतो. आम्ही म्हणायला तुरूंगाबाहेर वावरतो, पण आम्हाला वाटतं की आम्हीही तुरूंगात आहोत... अदृाय नजरांच्या! शिक्षा आम्हालाच मिळते आहे. उदरनिर्वाह करावा लागतो. मुलांना जगवायचं. बाहेर पडलं तर लगेच ऐकायला मिळतं, 'बघा, नवरा तुरूंगात. हिला रान मोकळं. आधी बाहेर पडत नव्हती. आता उंडारत बाहेर पडत नव्हती. आता उंडारत फिरत असते नुसती...' घरी मुलांसाठी स्वयंपाक-पाणी करावा तर लागतोच ना! किती दुःखी आहोत, हे आम्हालाच माहीत पण जगण्यासाठी मुलांना जेवायला घालायला हवं ना. स्वयंपाक केला. मुलांना जेवायला वाढलं की नेमकं कोणीतरी येतं आणि मग म्हणत बसतात, 'बघा यांना काही वाटतं का... बाप तुरूंगात आहे याच खादाडत बसतात!' नीट-नेटकही रहायचं नाही. मुलांनही शाळेत जावसं वाटत नाही. 'बाप खुनी' म्हणून पोरे चिडवतात. त्यांच्यात सामील करून घेत नाहीत. वाळीत टाकल्यासारखंच झालं. आमच्याकडे अशाच नजरेनं पाहिलं जातं. माणूस म्हणून जगणंच अवघड होऊन गेलंय. आमच्यावर कायम हे दुःखाचं सावट असतंच! त्यातून सध्या तरी सुटका नाही. मुलांची समजूत काय घालणार? पण त्यांचं आयुष्य घडवायचं.... म्हणून मग मी खंबीर होते. सगळ्यांच्या सगळ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करते. मुलांनाही दुर्लक्ष करायला शिकवले. त्यांच्या शिक्षणावरच आता माझा फोकस. तीही अकाली प्रौढ झाली आहेत. परिस्थितीची जाणीव त्यांना झाली आहे. हट्ट करत नाही... कसल्या आवडीनिवडी नाही... ताटात जे पडेल ते मुकाट्याने खातात. त्यांच्याकडे पाहिलं की पोटात तुटतं. हसण्याखेळण्याच्या वयात त्यांच्यावर ही परिस्थिती ओढवली. सुकलेल्या फुलासारखेच झालेत.

नवरा तुरूंगात आहे... चार भिंतीच्या आत! तो बाहेर पडू शकत नाही. जेलरच्या-पोलिसांच्या नजरेत राहतो पण माणूस म्हणून राहतो. आम्ही मुक्त आहोत म्हणायला. त्या चार भिंतीच्या बाहेर पण दुनियेच्या जेलमध्ये. आमच्यावर साऱ्यांचीच नजर. खुन्याची बायको-खुन्याची मूलं म्हणून आमच्याकडे पाहिलं जातं. प्रसंगी वाईट वागणूक मिळते. सारे वाळीत टाकल्यारखे वागवतात. माणूस म्हणून आम्हाला कोणीच वागवत नाहीत. त्यामुळे आम्हाला वाटतं, आम्हीच आहोत जगाच्या खुल्या तुरूंगात! खरी शिक्षा तर आम्हीच भोगत आहोत. काहीही अपराध केलेला नसताना!

सुजाताचं सारं ऐकून मी खरेच अंतर्मुख झाले. समाजात असं बऱ्याचदा घडतं. 'अशी शिक्षा भोगणारे' आपल्या अवतीभोवती पहायला मिळतील. त्यांना तरी माणुसकीची वागणूक द्यायला हवी. ■

## उड्डाण पुलाखाली



उड्डाण पुलाखाली
लहानची ती मोठी झाली
तिच्या चेहऱ्यावर विलसणारं
गर्भारपणाचं तेज पाहून
समजतंय,
निसर्गानं आपलं काम चोख बजावलंय
यथावकाश दिलाय तिने
एका गोंडस मुलाला जन्म
आता सिग्नलला थांबून
भोवतालच्या गर्दीत
भिरभिरत्या नजरेने
घेतेय ती
बाळाच्या बापाचा शोध!

■

उड्डाणपुलाखाली
दीनवाण्या चेहऱ्यानं
भीक मागणारी मुलं पाहून वाटतं
हीच का या देशाची भावी पिढी?
याचक म्हणून जगणारी!
पण ह्याच मुलांकडून
गरगरीत पोटावरुन
ढासळणारी पॅन्ट सावरीत
कोपऱ्यात उभ्या असलेल्या मामानं
केलेली हप्तावसूली पाहून
संभ्रम पडतो
खरा भिकारी कोण?
ही मुलं का तो मामा?
उत्तर वाचकानी शोधावं!

■


उड्डाण पुलाखाली
आपलं बालपण विसरुन
भीक मागणारी मुलं
कमावतात दिवसाकाठी
पाच-पन्नास रुपये
उदर निर्वाहासाठी!
अन् संध्याकाळी
देतात ते पोलिसाला
दहा रुपयांचा हप्ता
बिन दिक्कतपणे!
यापेक्षा वेगळं दानशूरत्व
आणखी काय असू शकतं?

■

उड्डाण पुलाखाली
परदेशासारखे
सुंदर उद्याने खुलण्याऐवजी
स्थिरावलेत येथे
अनेकांचे संसार
येथेच होतात त्यांचे विवाह
सुहागरात्रही येथेच रंगते
संसार वेलीवर फुलेही उमलतात
अन्
रोजगारही येथेच मिळतो
यांना न कसली चिंता
ना कसलं भय
नसतो यांचा बँक बॅलन्स
नसतो यांना आयकराचा त्रास
एक हप्ता पोलिसाकरवी
स्थानिक पुढाऱ्याला पोहोचल्यावर
विसावतात ते जन्मभर आनंदात
याच उड्डाण पुलाखाली
याच उड्डाण पुलाखाली

■

शहरात ठिकठिकाणी उभारलेल्या
उड्डाण पुलाखाली
सिग्नलला थांबताना
दिसतात मला
आठ-दहा वयोगटातील
लहान मुले
कधी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला
तर कधी प्रजासत्ताकदिनाच्या पूर्वसंध्येला
देशाचा तिरंगी झेंडा विकताना
तर ख्रिसमसच्या निमित्ताने
सान्ताक्लॉज विकताना
कधी पावसाळ्यात विकतात ते छत्र्या
पावसात भिजत-भिजत
तर कधी उन्हाळ्यात
गार पाण्याच्या बाटल्या
उन्हात पोळत-पोळत
चित्रांची पुस्तकेही विकतात ते
लहानग्यांच्या खुशीसाठी
खेळणीही असतात त्यांच्याकडे
खेळण्याच्या वयात पण
अशी खेळणी विकताना पाहून
आतून गलबलून येतं
पण थोडं समाधानही वाटतं
देशाची भावी पिढी
कष्टाने कमावून खातेय याची
ऐदीपणाच्या विळख्यातून सुटून
प्रामाणिकपणे जगतेय याची



■ **सौ. चंद्रलेखा बेलसरे**
पुणे, ८५५४९८१९७१

काव्यपुष्प



## तोच तो

तोच तो 'सोन्याचा गोळा', रोज वाटतो नवा नवा,
त्याच त्या सुख-दु:खांना, बुरखा नेसवतो नवा नवा

ईमान-मैत्री-प्रेम-निष्ठा, यांची चाखवून थोडी हवा,
दाखवून अशी खेळणी आम्हा, खेळ खेळवतो नवा नवा

'स्वप्नांची इंद्रधनू' हाकारितो, जणू पाखरांचा थवा
'ध्येयांची गाजरे' दाखवीत, रस्ता चालवितो नवा नवा

थपालेली असते भाकरी, तापलेलाही असतो तवा
'उपवासाचा' प्रकार नेमका, तो सांगतो नवा नवा

विकत जायचीही तयारी करते, मन घट्ट करून जवा
'सौदागर!' तो खिजवून म्हणतो, ''माल हवा मज नवा नवा...''

मना वाटते कधी 'सोनियाचा दिस' आज 'अमृते' नहावा
'जहर' पाठवतो नेमके तेव्हा, तो 'पेला' बदलून नवा नवा

कुठवर सोसणे असे जिणे, मनात येते जवा कवा
प्रतिक्षा कर म्हणतो जरा, ''आत्ता 'अवतार' घेतो नवा नवा''

■ **प्रा. दत्ताजीराव थोरात**
जितेंद्र हेरिटेज, सी १/५, सुतारवाडी, पाषाण, पुणे २१

## करा देशभक्ती साकार



मनसागरी उसळाव्या देशभक्तीच्या अनंत लाटा
जेणे करून स्फुरतील विकासाच्या नवनवीन वाटा

देशभक्तीपायी विसरून जावे मन देहभावा
देशभक्तीपुढे नगण्य सारे म्हणुनी भजावे देशदेवा

देशभक्तीचा असावा मनापासून अतिअभिमान
सर्वांनी देशभक्ती अशी करावी, होईल उन्नत देशाची मान

देश आहे म्हणुनी देह आपला शाबुत आहे
कारण देह आपला देशाच्याच काबूत आहे

देशवासियांनो नका विसरू कधी आपुल्या देशदेवा
करूनी त्याची यथार्त सेवा सत्कार्यी लावा देहभावा

देशभक्तीस्तव आठवा त्या सर्व शूर वीरांना
ज्यांनी अर्पियले सर्वस्व आपुले उन्नत करूनी आपुल्या माना

देशभक्तीचे असती म्हणुनी नानाविध प्रकार
निवडा तुम्ही एक वा अनेक, करा देशभक्ती साकार

■ **मोरेश्वर ब्रह्मे,** पुणे
९३२६९३९१७६

**कविता पाठवा**

**साप्ताहिक 'चपराक'साठी आपल्या स्वरचित कविता अवश्य पाठवाव्यात.**
**योग्य त्या कविता अंकातून प्रकाशित केल्या जातील.**
**कविता पाठविण्यासाठी पत्ता :** 'चपराक प्रकाशन', ६१७, साईकृपा अपार्टमेंट,
शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२
ईमेल : kavyapushp3@gmail.com

# महिलांनी सकारात्मक रहावे : आशा ज्ञाते

हडपसर, (प्रतिनिधी) :

महिला या घरातील आत्मा असून त्यांनी येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीपुढे न झुकता आत्मविश्वासाने त्याचा सामना केला पाहिजे. सर्व परिस्थितीत महिलांनी सकारात्मक असे राहिले पाहिजे. समाजामध्ये मूल व चूल या भावनेने महिलांकडे पाहिले जायचे परंतु स्त्री शक्ती काय आहे याची प्रचिती राष्ट्रपती प्रतिभा पाटील, अंतराळवीर कल्पना चावला या महिलांनी दाखवून दिली आहे, असे विचार प्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री आशा ज्ञाते यांनी व्यक्त केले.



सातववाडी येथील युवक प्रतिष्ठानच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त सन्मान स्त्री शक्तीचा आदर्श महिला पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित केला होता त्या वेळी त्या बोलत होत्या. या वेळी प्रसिद्ध अभिनेता किशोर नांदलस्कर, नंदकुमार आजोतीकर, जयसिंग गोंधळे, महेंद्र बनकर, दिलीप शंकर तुपे, पुणे शहर युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत सुरसे, वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते मनोहर होडे, बाबा बनकर, महादेव जामले, संजय धामे, बच्चूसिंग टाक, डॉ. शंतनु जगदाळे, नामदेव कोतवाल, विजय भिंताडे, विनोद धुमाळ, ओमप्रकाश झंवर, स्वप्निल धर्मे, पल्लवी सुरसे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सन्मान स्त्री शक्तीचा आदर्श पुरस्कार अनुक्रमे रखमाबाई होले, तारामाई शेडगे, वत्सला महामुनी, अंजली जवळकर, उल्का खैरे, शोभा राख, नलिनी लोहार, मनिषा टिळेकर, सविता म्हेत्रे, अश्विनी फुले, सुरेखा पुजारी, कमल मोहिते, कमल थंगेडिया, अनुराधा खरे, सुरेखा मोरे, चंद्रकला बरडे, माधवी खांदवे, सुरेखा भाडळे, मंदाताई शेडगे, उज्वला सावकर, सुरेखा भिंगारे, सुरेखा करावडे, प्रतिभा भोसले, जनाबाई डिंबळे, कलावती वागदुर्गी व शिल्पा दाणवे यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. सन्मानचिन्ह, शाल व तुळशीचे रोप असे पुरस्काराचे स्वरूप होते.

प्रमुख पाहुणे सिने अभिनेता किशोर नांदलस्कर आपल्या जीवनातील अनुभव सांगत असताना भावुक झाले. यावेळी प्रशांत सुरसे, जयसिंग गोंधळे, नंदकुमार आजोतीकर, महेंद्र बनकर आदींनी मनोगत व्यक्त केले. समारंभाचे प्रस्ताविक पुणे जिल्हा सार्वजनिक वितरण व्यवस्था व दक्षता समिती सदस्या पल्लवी सुरसे यांनी केले. समारंभाचे संयोजन नलिनी झंवर, सुजाता पोमण, मेघना साळुंखे, सुरेखा जगतापल मोना खाडे, कल्पना बागलावे, सविता खोपडे, चेतना भळगट, अनघा खरे, लता झंवर, हरिष शेलार, सचिन नेमकर, उल्हास भोंगळे, चिरनाघ सरडे, निखिल करे, राजेश म्हामुनकर, किशोर रणदिवे, बापू काळाणे, श्रीकांत कळसकर, सुनिल टिळेकर, तात्या पवार यांनी केले. सुत्रसंचालन चेतना भळगट यांनी तर आभार प्रदर्शन स्वप्निल धर्मे यांनी केले.

## 'शासन आपल्या दारी'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

लोणी काळभोर (वार्ताहर) :

हडपसर येथील नेताजी सुभाष मंगल कार्यालयात आयोजीत केलेला शासन आपल्या दारी या कार्यक्रमाला लोकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. लोकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी व तालुका प्रशासन लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी, शासनाच्या विविध योजनांविषयी माहिती लोकांना कळावी म्हणून असे कार्यक्रम आयोजीत करावे असे आमदार योगेश अण्णा टिळेकर यांनी सांगितले.

या कार्यक्रमात महसूल, पंचायत समिती, कृषी, आरोग्य, परिवहन, महावितरण, पशुसंवर्धन, बँक, रेशनिंग आदी विभागाचा समावेश केलेला होता. या विषयी संदीप दळवी म्हणाले की, आम्ही वीसपेक्षा जास्त गावात फिरून लोकांना या कार्यक्रमाचे परिपत्रक देऊन माहिती दिली. आधारकार्ड काढणे, रेशनिंग कार्ड काढणे व दुरूस्ती करणे, बँक खाती, उत्पन्नाचे दाखले, ज्येष्ठ नागरिक दाखले, संजय गांधी निराधार योजना अशा अनेक योजना आम्ही लोकांपर्यंत पोहचवू शकलो व लोकांनी त्याचा फायदा घेतला. या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते प्रतिक खेडेकर व अनेक कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

पान १ वरून...

## 'लकवा'मार विकारवंत!

तारे तोडणे ही व अशी कामे 'वारसा प्रकारा'त मोडतात का?

'आम्ही मराठे कुणाला घाबरत नाही. आम्हा सगळ्यांनाच तुरूंगात टाका' असे बालिश विधान खासदार सुप्रिया सुळे यांनीही नुकतेच केले आहे. (भुजबळ, तटकरे, अजतदादा यांचे भवितव्य त्यांना दिसत असणार!) सुप्रियाताईंच्या 'बाबां'नी आजवर कायम जातीचे राजकारणच केंद्रस्थानी ठेवले आहे. 'मराठा लीडर' अशी प्रतिमा असूनही त्यांनी मराठा समाजासाठी नेमके काय केले याचेही उत्तर कोणी देऊ शकणार नाही. पवारांमुळे किती 'मराठा' शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या किंवा पवारांनी किती 'मराठा' नेते तयार केले? हा प्रश्न उपस्थित केला तर त्याचे उत्तरही नकारात्मकच येते. केवळ गरजेपुरते जातीय अस्मितेचे राजकारण करून या लोकांनी कायम स्वत:ची तुंबडी भरलेली आहे.

कन्हैयाकुमार, कुमार सप्तर्षीपासून ते राजदीप सरदेसाई, जितेंद्र आव्हाड, सुप्रिया सुळेपर्यंत प्रत्यक्षात ज्यांचा धिक्कार करायला हवा त्यांना काहीजण 'नेते' मानून त्यांची पूजा बांधत आहेत.

राज्याचे माजी महाधिवक्ता श्रीहरी अणे हेही सध्या चर्चेत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्यादे असलेल्या अणेंनी वेगळ्या विदर्भाबरोबरच स्वतंत्र मराठवाड्याचीही मागणी केली आहे. मुंबईतील १०६ हुतात्म्यांनी जे बलिदान दिले त्याचा विदर्भ किंवा मराठवाड्याशी काहीही संबंध नाही, असा युक्तिवाद ते करतात. राज्य सरकारचा वकील राहिलेला हा पाखंडी 'विचारवंत' कसा असू शकेल? सध्या जिकडे-तिकडे अशा 'लकवामार विकारवंतां'चीच संख्या फोफावली आहे.

आचार्य अत्रे यांनी मालोजीबुवा निंबाळकर यांच्याविषयी लिहिताना सांगितले होते की, ''जन्मभर देहविक्रय करणाऱ्या वेश्येने म्हातारपणी लग्न लावल्यानंतर 'माझा नवरा मेला तर मी सती जाईन!' अशा पातिव्रत्याच्या वल्गना करू नयेत!''

पुरोगामित्वाच्या नावावर नाचणाऱ्या आजच्या 'विकारवंतां'चीही अशीच अवस्था आहे. त्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात काहीच तारतम्य नसते. सामान्य माणसापुढे जगण्यामरण्याचे अनेक गंभीर प्रश्न असताना अशा पद्धतीचे राजकारण कोणीही करू नये! देशातील सर्व प्रश्न संपले अशा आविर्भावातच कन्हैयासारख्या भुलभुलैयाचे उदात्तीकरण सुरू आहे. स्वार्थसंकुचित राजकारण, कुटीलतावाद, सर्व प्रकारचा कट्टरतावाद वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या 'लकवामार विकारवंतां'कडे दुर्लक्ष करून प्रत्येकाने आता माणुसकीच्या धर्मातून कार्यरत राहिले पाहिजे; तरच येणारे आरिष्ट्य थोपविण्यात आपण यशस्वी ठरू!

## मराठी लेखकांना आवाहन!

नमस्कार मित्रांनो!

'चपराक'चा वाचकवर्ग अल्पावधीतच सर्वदूर निर्माण झाला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जसे 'चपराक'चे सभासद आहेत, तसेच महाराष्ट्राबाहेरील मराठी वाचकांचाही आम्हाला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. 'वाचनसंस्कृती कमी होतेय' अशा खोट्या अफवा पसरविणाऱ्यांना आम्ही प्रत्यक्ष कृतीतून 'चपराक' दिली आहे.

वैविध्यपूर्ण विषयांवरील वाचनीय आणि दर्जेदार मजकूर दिल्याने 'चपराक'ची दखल सर्वत्र घेतली जातेय. आबालवृद्धांना हवाहवासा वाटेल असा अंक देण्याचा आमचा कयास असतो. सध्या लिखाणासाठी व्यासपीठ मिळत नाही, असाही सूर काहीजण लावतात. दर्जेदार लिहिण्याची ऊर्मी असणाऱ्यांसाठी 'चपराक' हे हक्काचे व्यासपीठ आहे. लिखाणाचा दर्जा हा एकमेव निकष असल्याने गुणात्मक साहित्याचे आमच्याकडे कायम स्वागत आहे.

कथा, कविता, लेख, चालू घडामोडीवरील आपली मते 'चपराक'कडे आवर्जून पाठवा. तसेच आपण साप्ताहिक 'चपराक' आणि 'साहित्य चपराक' मासिकाचे सभासदही अवश्य व्हा! तुम्ही सभासद असाल तर तुमच्या मित्रमंडळींना, नातेवाईकांना, वाचनाची आवड असणाऱ्या प्रत्येकाला आवर्जून सभासद करून घ्या!

**अंकाची वार्षिक वर्गणी (सर्व विशेषांकासह)**

**साप्ताहिकासाठी फक्त २०० ₹**

**मासिकासाठी फक्त ५०० ₹**

संपर्क

**'चपराक प्रकाशन'**

साईकृपा अपार्टमेंट, पहिला मजला, ६१७, शुक्रवार पेठ,
शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, पुणे ४११ ००२ ,
दूरध्वनी : ०२०-२४४६०९०९, ७०५७२ ९२०९२, ९२२६२ २४१३२
ईमेलः info@chaprak.com

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२ Email : info@chaprak.com